# प्रशासकीय अधिकारी
# सामान्य राज्य सेवा परीक्षा तयारी व मार्गदर्शन

महाराष्ट्र शासनाच्या विविध खात्यातील प्रशासकीय अधिकारी सामान्य राज्यसेवा, या पदाची भरती प्रक्रिया एमपीएससीमार्फत सरळ सेवा पद्धतीने केली जाते. लेखी परीक्षा व मुलाखतीतील गुणांनुसार अंतिम निवड केली जाते. दरवर्षी सुमारे 10 ते 50 पदे भरली जातात. 2016 च्या सुरुवातीस पुढील खात्यातील या पदांच्या भरतीसाठी जाहीरात प्रसिद्ध झाली होती-

1) प्रशासकीय अधिकारी, सामान्य राज्य सेवा, गट-ब, आयुर्वेद संचालनालय

2) प्रशासकीय अधिकारी, सामान्य राज्य सेवा, गट-ब, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय

इतर खात्यातील प्रशासकीय अधिकारी भरतीसाठीसुद्धा अशाच प्रकारे परीक्षा घेतली जाते. सदर परीक्षेचे स्वरुप, अभ्यासक्रम व भरती प्रक्रिया पुढीलप्रमाणे असते -

### परीक्षेचे टप्पे

* लेखी परीक्षा - 100 गुण
  मुलाखत - 25 गुण
* अंतिम गुणवत्ता यादी ही वस्तुनिष्ठ परीक्षेतील व मुलाखतीतील एकत्रित गुणांवर (125) आधारीत राहील.

### परीक्षा योजना

* विषय व संकेतांक - सामान्यज्ञान, बुद्धिमापन चाचणी व प्रशासकीय कामकाज (973)

  प्रश्नसंख्या - 50

  गुण - 100

  कालावधी - एक तास

  दर्जा - पदवी

  माध्यम - मराठी

  प्रश्नपत्रिकेचे स्वरुप - वस्तुनिष्ठ बहुपर्यायी

### अभ्यासक्रम

* सामान्य ज्ञान, बुद्धिमापन विषयक प्रशासकीय कामकाज या विषयांमध्ये खालील घटक व उपघटकांचा समावेश असेल-

1) सामान्य ज्ञान -

1) महाराष्ट्राचा इतिहास
2) महाराष्ट्राचा भूगोल
3) माहितीचा अधिकार कायदा - 2005
4) भारतीय राज्यघटना
5) संगणक व माहिती तंत्रज्ञान
6) मानवी हक्क व जबाबदाऱ्या
7) जागतिक तसेच भारतातील चालू घडामोडी - राजकीय औद्योगिक, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, भौगोलिक, खगोलशास्त्रीय, सांस्कृतिक, वैज्ञानिक इत्यादी

## 2) बुद्धिमापन विषयक प्रश्न -

उमेदवार किती लवकर व अचूकपणे विचार करू शकतो याचा अंदाज घेण्याच्या दृष्टीने सदर प्रश्न विचारण्यात येतील.

## 3) प्रशासकीय कामकाजाच्या संदर्भात लागू होणारे नियम व आदेश -

1) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981
2) महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम. 1981
3) महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण) अवधी, परकीय सेवा, निलंबन, बडतर्फी सेवेतून काढून टाकणे या काळातील प्रदाने) नियम, 1981
4) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, 1981
5) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, 1982
6) महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1971/विभागीय चौकशी पुस्तिका
7) महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम. 1979
8) लेखा विषयक बाबी
9) ज्येष्ठतासूचीबाबत
10) कार्यालयीन कार्यपद्धती
11) प्रशासकीय बाबी
12) न्यायालयीन बाबी

## परीक्षेच्या तयारीची दिशा

लेखी परीक्षेची तयारी करताना 3 घटकातील एकूण 27 उपघटकांचा अभ्यास करावयाचा आहे. त्यातील प्रश्नांचे वितरण खालीलप्रकारचे असू शकते -

अ) सामान्यज्ञान : 20 प्रश्न = 40 गुण

ब) बुद्धिमापन : 5 प्रश्न = 10 गुण

क) प्रशासकीय कामकाज नियम व आदेश:25 प्रश्न = 50 गुण

सदर परीक्षेची तयारी करताना एमपीएससीमार्फत आयोगाने घेतलेल्या पुढील परीक्षातील प्रश्नांचा संदर्भ घ्यावा-

अ) सामान्यज्ञान

1) महाराष्ट्राचा इतिहास -

परीक्षेत इतिहासावर 3 प्रश्न (6 गुण) असू शकतात. एमपीएससीच्या विविध स्पर्धा परीक्षेत इतिहासावरील प्रश्न हे साधारणपणे पुढील उपघटकावर विचारले जातात - सामाजिक व आर्थिक जागृती (1885-1947), महत्त्वाच्या व्यक्तींचे काम, स्वातंत्र्यपूर्व भारतातील सामाजिक जागृतीतील वर्तमानपत्रे व शिक्षणाचा परिणाम/भाग, स्वातंत्र्यपूर्व काळातील इतर समकालीन चळवळी, राष्ट्रीय चळवळी. विविध राजकीय नेते आणि समाजसुधारक यांचे वक्तव्य, महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळीच्या उदयास कारणीभूत घटक, महाराष्ट्रातील पहिल्या कापड गिरणीचे नाव, विविध संस्था आणि त्यांचे संस्थापक, होमरूल आंदोलन, काँग्रेस पक्षाच्या विविध समित्या, द्वैभाषिक मुंबई राज्य, घटनात्मक कायदे आणि त्यांचे वर्ष, विविध समाजसुधारक आणि संस्थांनी सुरू केलेल्या शाळा व संघटना, समाजसुधारकांचे कार्य.

संदर्भ साहित्य -

1) महाराष्ट्राचा इतिहास - इयत्ता 11 वी

2) महाराष्ट्र व भारताचा इतिहास - स्टडी सर्कल प्रकाशन

2) महाराष्ट्राचा भूगोल -

परीक्षेत भूगोलावर 3 प्रश्न (6 गुण) असू शकतात. एमपीएससीच्या विविध स्पर्धा परीक्षेत भूगोलावरील प्रश्न हे साधारणपणे पुढील उपघटकावर विचारले जातात - महाराष्ट्राचा रचनात्मक भूगोल, मुख्य रचनात्मक विभाग, हवामान,पर्जन्यमान व तापमान, पर्जन्यातील विभागवार बदल, नद्या, पर्वत व डोंगर, राजकीय विभाग, प्रशासकीय विभाग, नैसर्गिक संपत्ती- वने व खनिजे, मानवी व सामाजिक भूगोल- लोकसंख्या, स्थलांतर, ग्रामीण वस्त्या व तांडे, झोपडपट्ट्या व त्यांचे प्रश्न.

साधारणपणे महाराष्ट्राच्या भूगोलात पुढील मुद्दे विचारात घेतले जातात - महाराष्ट्रातील बेसॉल्ट खडकाची जाडी, भीमा व गोदावरी नद्यांची खोरी, घाट आणि संबंधित रस्ते, बेट आणि त्यांची स्थाने, महाराष्ट्रातील दगडी कोळशाची साठे आणि जलविद्युत केंद्रे, महाराष्ट्रातील 1951 ते 2011 पर्यंतची जनगणना, रेगुर मृदा आणि तिची वैशिष्ट्ये, युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीतील भारतातील स्थळे, जिल्ह्याची विविध नावे, क्षेत्रफळाच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्रातील महसुली विभागांचा क्रम, विविध

जिल्हयांतील फळांचे उत्पादन, खडकांचे प्रकार आणि महाराष्ट्रातील जिल्हे, दिलेल्या नकाशातील खनिजाचे उत्पादन करणारी स्थळे.

संदर्भ साहित्य -

1) महाराष्ट्राचा भूगोल - एच.के. डोईफोडे (स्टडी सर्कल)

2) महाराष्ट्राचा भूगोल - इयत्ता 9 वी

## 3) माहितीचा अधिकार अधिनियम 2005 -

परीक्षेत माहितीचा अधिकार अधिनियमावर 3 प्रश्न (6 गुण) असू शकतात. एमपीएससीच्या विविध स्पर्धा परीक्षेत माहितीचा अधिकार अधिनियमावरील प्रश्न हे साधारणपणे पुढील उपघटकावर विचारले जातात - माहिती आयुक्त, माहिती मिळण्यास लागणारा कालावधी, माहितीच्या अर्जाची हाताळणी आणि अपील.

संदर्भ साहित्य -

1) मानवी हक्क आणि कायदे - स्टडी सर्कल प्रकाशन

2) माहितीचा अधिकार - यशदा प्रकाशन

## 4) भारतीय राज्यघटना -

परीक्षेत भारतीय राज्यघटनेवर 3 प्रश्न (6 गुण) असू शकतात. एमपीएससीच्या विविध स्पर्धा परीक्षेत राज्यघटनेवरील प्रश्न हे साधारणपणे पुढील उपघटकावर विचारले जातात -

* भारतीय राज्यघटना - घटना तयार करण्यासाठी 1928 मध्ये नेमण्यात आलेली सर्वपक्षीय समिती, भारतीय राज्य घटनेची विविध परकीय स्रोत, मार्गदर्शक तत्त्वे, मूलभूत कर्तव्ये, घटनादुरुस्त्या, प्रास्ताविक, घटना समितीतील विविध समित्या व त्यांचे अध्यक्ष, अल्पसंख्यांकांचे मूलभूत शैक्षणिक हक्क, परिशिष्ट 6, कलम 17 आणि अस्पृश्यता निवारण, संविधानाची वैशिष्ट्य, एनटोसाई साई, केंद्र-राज्य संबंध, संविधानाचा भाग-3, समान नागरी कायदा.

* भारतीय राज्यव्यवस्था - महाराष्ट्रातील राज्य वित्त आयोग, विधान सभा निवडणुका, राष्ट्रपतीचा राजीनामा, लोकलेखा समिती, लोकसभेचे सभापती, कलम 108 नुसार संयुक्त बैठक, लोकसभेचा विशेष अधिकार, विधान परिषदेची निर्मिती व बरखास्ती, केंद्र राज्य संबंधाबाबतचे आयोग, महाराष्ट्रातील राज्यपाल, आंतरराज्य परिषदा, पक्षांच्या स्थापनांचा क्रम, देशातील विधान परिषदा, अनिवासी भारतीय नागरिकांचे राजकीय हक्क, राज्यसभेचे खासदार, लोकसभा विसर्जित झाल्यास होणारे परिणाम, भूसंसाधन खात्याचे मंत्रालय, राष्ट्रपतीचे अधिकार, संसदीय समित्या, भारतीय संसदेतील कलम 248, 249,

250, 253, लोकसभेचे उपसभापती, राज्यांचे कर, राज्यसभेचे अधिकार, संसदेचे कामकाज, पक्षांतर, महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण संचलनालय, उत्पादन शुल्क, विधानसभा अध्यक्ष, नदीजल वाटप तंटे, संयुक्त महाराष्ट्र चळवळ.

* न्यायमंडळ - महाधिवक्त्याला खाजगी वकिली करण्याचा अधिकार, सर्वोच्च न्यायालयाने प्रस्तुत केलेली मूलभूत गाभ्याची संकल्पना, जनहित याचिका, विशाखा विरुद्ध राजस्थान खटला, न्यायालयीन सक्रियता सुरू करणारे न्यायाधीश, रिट्स, सर्वोच्च न्यायालयाच्या कक्षा, न्यायालयीन पुनर्विलोकन, उच्च न्यायालय, रोमन लॉची तत्वे, लोक न्यायालय आणि दिवाणी प्रक्रिया संहिता.

* जिल्हा प्रशासन, ग्रामीण व नागरी स्थानिक शासन- या - प्रभाग समिती, ग्राम पंचायतीच्या उत्पन्नाची साधने, कटक मंडळे, 73 वी घटनादुरुस्ती, पंचायत राज, ग्रामसभा, जिल्हा परिषद, बलवंतराय मेहता समिती, जमीन महसुलाची ग्रामपंचायतीला मिळणारा वाटा, महानगरपालिका, आरक्षण, नगर परिषद, लखिना पॅटर्न, महाराष्ट्रातील जिल्हे, गट ग्रामपंचायत, अखिल भारतीय स्थानिक स्वराज संस्था, मुंबई उपनगर जिल्हा, जिल्हा नियोजन आणि विकास मंडळ, इ-पंचायत, कोकणातील महानगर पालिका, वसंतराव नाईक समिती, महानगर पालिकेचे अनिवार्य कामे, जिल्हाधिकारी, शहरी विकास कार्यक्रम.

संदर्भ साहित्य -

1) भारतीय राज्यघटना - इयत्ता 12 वी
2) भारतीय संविधान व राजकारण - स्टडी सर्कल प्रकाशन

## 5) संगणक व माहिती तंत्रज्ञान -

परीक्षेत संगणक व माहिती तंत्रज्ञानावर 3 प्रश्न (6 गुण) असू शकतात. एमपीएससीच्या विविध स्पर्धा परीक्षेत संगणक व माहिती तंत्रज्ञानावरील प्रश्न हे साधारणपणे पुढील उपघटकावर विचारले जातात -

ई-वाणिज्य शाखेसाठी मायक्रोसॉफ्ट आणि व्हिसा यांनी बनवलेली प्रणाली, ग्राहकांची वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवणारा कायदा, मोड्युलेशन तंत्र सिग्नल, संगीत क्षेत्रामध्ये संगणकाचा वाटा, संगणक संभाषण प्रधान करणारा कार्यक्रम, स्पाय वेअर, सायफर, वेब टेक्नॉलॉजी, वेब सेवा, सायबर धोका, मिडिया एशिया लॅब, माहिती तंत्रज्ञान कायदा, पॉली सेन्सर्स, आज्ञावली, डेटा लिंक, क्लास सी नेटवर्क, सायबर स्टॉकींग, लॅन, एचटीएमएल, राउटिंग, एक्सएमएल.

संदर्भ साहित्य -

1) माहिती तंत्रज्ञान व संगणक शास्त्र - स्टडी सर्कल

2) असिस्टंट एसटीआय मुख्य परीक्षा मार्गदर्शक -स्टडी सर्कल

6) मानवी हक्क व जबाबदाऱ्या -

परीक्षेत मानवी हक्क व जबाबदाऱ्यावर 3 प्रश्न (6 गुण) असू शकतात. एमपीएससीच्या विविध स्पर्धा परीक्षेत मानवी हक्क व जबाबदाऱ्यावरील प्रश्न हे साधारणपणे पुढील उपघटकावर विचारले जातात - संकल्पना - आंतरराष्ट्रीय मानवी हक्क मानक, त्यासंदर्भातील भारतीय राज्यघटनेतील तरतूद, भारतातील मानवी हक्क व जबाबदाऱ्या यंत्रणेची अंमलबजावणी व संरक्षण, भारतातील मानवी हक्क चळवळ, मानवी हक्कापासून वंचित राहण्याच्या समस्या, गरिबी, निरक्षरता, बेकारी, सामाजिक - सांस्कृतिक - धार्मिक प्रथा यासारख्या अडचणी, (हिंसाचार, भ्रष्टाचार, दहशतवाद, कामगारांचे शोषण, संरक्षित गुन्हेगारी, इत्यादी.) लोकशाही व्यवस्थेतील एकमेकांचे हक्क आणि मानवी प्रतिष्ठा व एकतेचा आदर करण्यासंबंधी प्रशिक्षणाची गरज व महत्त्व, नागरी हक्क संरक्षण अधिनियम 1955, मानवी हक्क संरक्षण अधिनियम 1993, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम 2005, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण नियम 2005, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम 1989, हुंडाबंदी अधिनियम 1961, महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान.

संदर्भ साहित्य -

1) मानवी हक्क व एमपीएससी परीक्षेतील कायदे - स्टडी सर्कल

2) असिस्टंट एसटीआय मुख्य परीक्षा मार्गदर्शक -स्टडी सर्कल

7) जागतिक तसेच भारतातील चालू घडामोडी -

परीक्षेत या घटकावर 3 प्रश्न (6 गुण) असू शकतात. जागतिक तसेच भारतातील चालू घडामोडी असे जरी अभ्यासक्रमाचे नाव असले तरी महाराष्ट्रातील (राजकीय औद्योगिक, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, भौगोलिक, खगोलशास्त्रीय, सांस्कृतिक, वैज्ञानिक इत्यादी) घटनावरही प्रश्न विचारले जाऊ शकतात. हे प्रश्न परीक्षेच्या पूर्वी साधारणपणे 2-3 महिने घडलेल्या विज्ञान-तंत्रज्ञान, पर्यावरण, प्रशासन, क्रिडा, आरोग्य, शेजारील राष्ट्रांशी संबंध, पुरस्कार, नेमणुका, भौगोलिक घटना, शासकीय निर्णय, कायदा सुव्यवस्था, आर्थिक आणि औद्योगिक क्षेत्र, विविध समित्या यावर विचारले गेले होते. परीक्षेपूर्वी अगदी 15 दिवसांमध्ये घडलेल्या घटनासुद्धा परीक्षेत विचारण्यात येतात.

संदर्भ साहित्य -

1) स्टडी सर्कलची मासिके आणि साप्ताहिक - स्पर्धा परीक्षा नोकरी संदर्भ, जनरल नॉलेज, नोकरी मार्गदर्शक व्यवसाय.

2) *www.studycircle.guru*

## 2) बुद्धिमापन

### 2) बुद्धिमत्ता चाचणी -

परीक्षेत बुद्धिमत्ता चाचणीवर 5 प्रश्न (10 गुण) असू शकतात. एमपीएससीच्या विविध स्पर्धा परीक्षेत बुद्धिमत्ता चाचणीवरील प्रश्न हे साधारणपणे पुढील उपघटकावर विचारले जातात - संख्या मालिका, वर्गीकरण, सांकेतिक भाषा, बैठक रचना, विधान आणि गृहीतक, क्रम, अनुमान निष्कर्ष, कॅलेंडर व दैनंदिनी, दिशा व अंतर, खरेदी-विक्री, नातेसंबंध, वेळ आणि वेग,

* आकृत्यांवरील प्रश्न- कागदाची घडी घालून घन तयार करणे आणि त्यानुसार तयार होणाऱ्या आकृत्या ओळखणे, आरशातील प्रतिमा फिरवल्यानंतर त्यात होणारे बदल, चौरसात वर्ण किंवा अंक देऊन प्रश्नचिन्हाजागी येणारे चिन्ह, संख्या किंवा अंक ओळखणे किंवा त्यानुसार तयार होणारी प्रतिमा ओळखणे, चिन्हांचे आरशातील परावर्तन, घड्याळातील काट्यामुळे तयार होणाऱ्या प्रतिमा, समानार्थी आकृत्या, आकृत्यांचे वर्गीकरण, वेन डायग्राम, आकृतीतील चौकोन इत्यादी.

संदर्भ साहित्य -

1) बुद्धिमापन चाचणी - स्टडी सर्कल प्रकाशन

## 3) प्रशासकीय कामकाजाचे नियम व आदेश

परीक्षेत या घटकावर 25 प्रश्न (50 गुण) असू शकतात.हा घटक विषयज्ञानाचा भाग असल्याने त्याची तयारी करताना संबंधित बेअर ॲक्ट्स किवा नियम वाचणे आवश्यक असते. या घटकाचे 2 भाग आहेत - (1) नियम आणि (2) प्रशासकीय कामकाजाच्या बाबी. येथे 7 नियमांचा अभ्यास करावयाचा असून 5 उपघटक प्रशासकीय कामकाजा बाबत आहेत. पुढील प्रत्येक नियमावर प्रत्येकी 2 ते 3 असे 15 प्रश्न विचारले जाऊ शकतात

1) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981

2) महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम. 1981

3) महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण) अवधी, परकीय सेवा,निलंबन, बडतर्फी सेवेतून काढून टाकणे या काळातील प्रदाने) नियम, 1981

4) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, 1981

5) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, 1982

6) महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1971

7) महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम. 1979

तसेच उर्वरित घटकावरही प्रत्येकी 2 ते 3 असे 10 प्रश्न विचारले जाऊ शकतात -

1) लेखा विषयक बाबी
2) ज्येष्ठता सूचीबाबत
3) कार्यालयीन कार्यपद्धती
4) प्रशासकीय बाबी
5) न्यायालयीन बाबी / विभागीय चौकशी पुस्तिका

## मुलाखत

या परीक्षेत मुलाखतीस खूपच महत्त्व असते. अंतिम निवडी साठी 50 गुणांच्या मुलाखतीत किमान 21 गुण आवश्यक असतात. येथे उमेदवाराचा नि:पक्षपातीपणा, एखाद्या घटनेचा सर्व दृष्टिकोनातून विचार करण्याची वृत्ती आणि प्रशासकीय नियम, आदेश व कायदेविषयक क्षमता तपासली जाते.